महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

# अधीक्षक अभियंता, सा.बां.(आदिवासी) मंडळ, नाशिक

आदिवासी विकास भवन,गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक- ४२२००२
email id: tribalnashik.se@mahapwd.com

दिनांक :-३१/०७/२०१९

जा.क्र. आस्था/ ४७९ /सन २०१९

**प्रति,**
मा.सहाय्यक संचालक, (जाहिरात)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, तळमजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०००३२.

**महोदय,**

या कार्यालयाची सोबत जोडलेली जाहीरात राज्यस्तरावरून वृत्तपत्रात प्रसिध्दीसाठी विहीत नमून्यात पाठवित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कार्यालयाचे नांव | : | अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक<br>**पत्ता:-** तळमजला, सिध्दीविनायक वसाहत, शासकीय निवास्थाने, बांधकाम भवन समोर, पंचायत समिती शेजारी, त्रंबकरोड, नाशिक ४२२ ००५ |
| २) | प्रसिध्दीकक्ष | : | राज्य स्तरावरून एक दैनिक फक्त एक वेळा. |
| ३) | जाहीरात कोणत्या तारखेस प्रसिध्द करावयाची आहे | : | दिनांक ०५/०८/२०१९ अगर तत्पूर्वी. |
| ४) | बिल कोणाचे नांवे करून आदा करणेसाठी पाठवावयाचे आहे. | : | कार्यकारी अभियता, सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे<br>दुरध्वनी क्रं. (०२२२)- २५४१००४६ |

**सोबत** :- जाहिरातीच्या प्रती-६

Suresh Sitaram Bachache

Digitally signed by Suresh Sitaram Bachache
DN: c=IN, o=Personal,
2.5.4.20=c74e6814487f140ecb8ba58f3de5fb20f0c7e374d7a2c9b8e8105cccf99bb445,
postalCode=416114, st=MAHARASHTRA,
2.5.4.45=034100613662356665313933656437326635626530633533376537633537613066366534373539303638333933396437363065623134333931343838613463332623265,
serialNumber=5d496036149fbd81d354dbf618a0534dfd826ed21e8bddf1183df203839a8666,
cn=Suresh Sitaram Bachache
Date: 2019.08.01 11:47:54 +05'30'

**अधीक्षक अभियंता,**
**सा.बां. (आदिवासी) मंडळ,**
**नाशिक**

**प्रत:-** मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
**प्रत** :-मा.आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य,नाशिक यांना माहितीसाठी सादर.
**प्रत:-** मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
**प्रत:-**अधीक्षक अभियंता सा.बां. (आदिवासी) मंडळ, नागपुर यांना महितीकरीता सस्नेह अग्रेषित.
**प्रत:-** संचालक माहिती तंत्रज्ञान व समन्वय केंद्र, आय.टी.सी.सी. पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी व **www.mahapwd.com** व **tribal.maharashtra.gov.in** वेबसाईटवर प्रसिध्द करणेसाठी.
सोबत :- वरीलप्रमाणे
**प्रत:-**कार्यकारी अभियंता सा.बां. (आदिवासी) विभाग, धुळे / ठाणे यांना महितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

www.nmk.co.in

# जाहिरात

**विषय :-** महाराष्ट्र शासनाचे आदिवासी विकास विभागांतर्गत बांधकाम व्यवस्थापन कक्षामध्ये आयुक्त आदिवासी विकास विभाग, यांचे वतीने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम आदिवासी) मंडळ, नाशिक व नागपुर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेकरिता नामिकासुची (Empanelment List) तयार करणे. - कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) आणि स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक.

आदिवासी विकास विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक व नागपुर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधील धुळे,ठाणे,अमरावती व चंद्रपुर विभागीय कार्यालयांतर्गत विविध उपविभागीय कार्यालयात निम्नदर्शित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) आणि स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक संवर्गातील पदे करार पध्दतीने भरणेसाठी नामिकासुची (Empanelment) तयार करणेसाठी पात्र सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेकडून विहित नमुन्यातील अर्ज खालील नमूद केलेल्या ठिकाणी व्यक्तीश: किंवा टपालाने अथवा tribalnashik.se@gmail.com या E-Mail ID वर **दि. ०५/०८/२०१९ ते दिनांक १९/०८/२०१९** रोजी पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत. या मुदतीनंतर कोणतेही अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

पायाभूत सुविधा निर्मीतीसाठी करार पध्दतीने शासकीय सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता(श्रेणी-२) आणि स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक यांची रिक्त पदे भरावयाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | मंडळ | पदाचे नांव | करार पध्दतीने भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, **नाशिक अंतर्गत** नाशिक,धुळे,नंदुरबार, तळोदा,कळवण,संगमनेर,शहापुर,जव्हार,डहाणु येथील आदिवासी क्षेत्राकरिता | | |
| | **नाशिक** | कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) | ०५ |
| | | स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक | ०४ |
| | | **एकुण** | **०९** |
| २ | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, **नागपुर अंतर्गत** चंद्रपुर, गडचिरोली, आल्लापल्ली, नागपुर,धारणी, किनवट, झरीजामणी येथील आदिवासी क्षेत्राकरिता | | |
| | **नागपुर** | कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) | ०४ |
| | | स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक | ०३ |
| | | **एकुण -** | **०७** |

**अ) पदासाठी शैक्षणिक अर्हता:-**

१. शासन मान्यताप्राप्त स्थापत्य अभियांत्रिकी पदविका किंवा पदवी धारण करणारा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी.

२. पायाभूत सुविधा निर्मीती (रस्ते,पूल व इमारती) मध्ये किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**ब) वयोमर्यादेची अर्हता:-**

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे कमाल वयोमर्यादा ही ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

**क) करार पध्दतीने करावयाच्या नियुक्तीबाबत अटी व शर्ती :-**

१. करार पध्दतीने नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतू अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरिता दरवर्षी आवश्यकतेनुसार नूतनीकरण करता येईल आणि एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

www.nmk.co.in

**ड) मासिक पारिश्रमिक व भत्ते- :-**

**१) मासिक पारिश्रमिक**

**(क) शासकीय / निमशासकीय सेवा** — सेवानिवृत्त अधिका-यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करारपध्दतीने नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्त्याच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळुन) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्याच्या करार पध्दतीने नियुक्त्याच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्ष) कायम राहील.

*(तथापि वेतनासाठी शासनाकडुन अनुदान मिळत नसलेल्या शासकीय उपक्रम, महामंडळे, मंडळे, संविधिक संस्था यांच्या बाबतीत वरीलप्रमाणे निश्चित होणा-या मासिक पारिश्रमिकाची रक्कम वाढविण्याचे अधिकार संबंधीत शासकीय उपक्रम /महामंडळे/मंडळे यांच्या संचालक मंडळास आणि संविधिक संस्थेच्या प्रमुखास / अध्यक्षास राहील)*

**(ख) निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा** — ज्या सेवानिवृत्त अधिका-यांच्या निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करारपध्दतीने नियुक्त करतांना सेवानिवृत्तीपुर्व मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करुन त्याआधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात येईल.

२. **भत्ते** :- उक्त तरतुदीनुसार निश्चित होणा-या मासिक पारिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादापेक्षा एकमुस्त रक्कम निवास भत्ता, प्रवासभत्ता आणि दुरध्वनी भत्ता या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी.

३. **प्रवासभत्ता व दैनिक भत्ता** :- करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळेच्या वेतनामानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

४. पारिश्रमिक रक्कमेची गणना करणेकामी सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले एकूण वेतन व आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन यासंबंधातील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

५. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

६. असा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र **रू.१००/- चे नोंदणीकृत स्टॅम्पपेपरवर** नियुक्तीच्या वेळी देणे आवश्यक आहे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने व विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवारांकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, यांचा समावेश करून सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करारात करण्यात यावा.

८. अशा अधिकारी/कर्मचा-याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी.

९. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०. असा अधिकारी/कर्मचारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

११. अशा अधिकारी/कर्मचारी यांनी conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

१२. अशा अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरून प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१३. अशा करार पध्दतीवरील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

१४. नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१५. शासकीय निवासस्थानात रहाणा-या व्यक्तीची करार पध्दतीनें नेमणूक केल्यास व करार कालावधीत तो अधिकारी शासकीय निवासस्थानात रहात असल्यास त्याच्याकडून नियमानुसार अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्यात येईल.

१६. वरील पैकी एकाही अटीची पूर्तता होत नसलेस अर्जदार यांचा अर्ज अपात्र ठरेल. तसेच ज्यांचे अर्ज अपात्र ठरतील त्यांना या बाबत काहीही कळविले जाणार नाही तसेच कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

१७. अश्या रितीने तयार केलेल्या नासिकासुचीव्दारे आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची पदे भरण्यात येतील.

www.nmk.co.in

**ई) आवश्यक सूचना:-**

१. **सदर पदाकरिता सविस्तर अटी शर्ती** www.mahapwd.com व tribal.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावरही उपलब्धत करणेत आलेला आहे. सदर विहित नमुन्यातील अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात किंवा टंकलिखित करुन फोटोसह सादर करण्याचा आहे. विहीत नमुन्यात नसलेले व अपूर्ण अर्ज अपात्र समजणेत येतील.**

२. अर्जामध्ये उमेदवाराने संपूर्ण नांव, पत्रव्यवहाराचा पत्ता, जन्मतारीख, वय, शैक्षणिक अर्हते बाबतचा संपूर्ण तपशिल, कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत तपशिल इत्यादी माहिती नमुद करणे आवश्यक आहे. अपूर्ण माहिती भरलेले अर्ज अपात्र ठरविणेत येतील.

३. अर्जासोबत २२ सें.मी.×१२ सें.मी.आकाराचा स्वतचे नांव व पत्यासह पोष्टाचे रुपये १०+२चे तिकिट लावलेला लिफाफा जोडावा

४. उमेदवारांनी आपले अर्ज समक्ष किंवा पोष्टाव्दारे खालील पत्यावर **दिनांक १९/०८/२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर पोष्टाव्दारे वा अन्य प्रकारे प्राप्त होणा-या अर्जांची अथवा त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

५. वयाबाबत जन्मतारखेचा दाखला / शाळा सोडलेचा दाखला/सेवापुस्तकाचे पहिल्या पानाची प्रत यावरुन ग्राहय धरता येईल. सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत जोडलेला नसल्यास अर्ज आपोआप अपात्र ठरेल.

६. शासनाने सदर भरतीबाबत/नियुत्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक,आदेश इ.लागु राहतील.

७. वरील पैकी एकाही अटीची पूर्तता होत नसलेस अर्जदार यांचा अर्ज अपात्र ठरेल. तसेच ज्यांचे अर्ज अपात्र ठरतील त्यांना या बाबत काहीही कळविले जाणार नाही तसेच कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

८. सदरचे भरती प्रक्रियेत पदांचे फेरबदल तसेच भरती प्रक्रिया कोणत्या कारणास्तव स्थगित अथवा रदद करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी राखून ठेवीत आहेत.

९. सदर जाहिरात www.mahapwd.com व tribal.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

नियुक्तीबाबतच्या सविस्तर अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना www.mahapwd.com व tribal.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर अटीशर्ती व अर्जाचा नमुना **अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक** या कार्यालयात सुट्टीचे दिवस सोडुन पाहता येईल अथवा विनाशुल्क उपलब्ध होईल.

**अर्ज पाठविण्याचा पत्ता -** **अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक तळमजला,सिध्दीविनायक वसाहत, शासकीय निवास्थाने, बांधकाम भवन समोर, पंचायत समिती शेजारी, त्रंबकरोड, नाशिक ४२२ ००५**

जा.क्र.आस्था/ ४७९ /२०१९
अधीक्षक अभियंता,
सा.बां. (आदिवासी) मंडळ, नाशिक
दिनांक ३१/०७/२०१९

Suresh Sitaram Bachache

Digitally signed by Suresh Sitaram Bachache
DN: c=IN, o=Personal,
2.5.4.20=c74e68144487f140ecb8ba58f3de5fb20f0c7e374d7a2c9b8e8105cccf99bb445,
postalCode=416114, st=MAHARASHTRA,
2.5.4.45=034100613662356665313933656437326635626530633533376537633537613066366534373539303638333933396437363065623134333931343838613463326232 65,
serialNumber=3d496036149fbd81d354dbf618a0534dfd826ed21e8bddf1183df203839a8666, cn=Suresh Sitaram Bachache
Date: 2019.08.01 12:02:37 +05'30'

**अधीक्षक अभियंता,**
**सा.बां. (आदिवासी) मंडळ,नाशिक**

www.nmk.co.in